# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**कार्यालयीन आदेश**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/पदोन्नती/२०१७/ १८८५

दिनांक :- 31 MAY 2017

संदर्भ :- १. शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.टिईएम/३३८९/५५९०९/ तांशि-१ अ, दिनांक १६-०६-१९८९

२. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शा.नि.क्र.जिईसी/३३९६/ (७३७६)/तांशि-१, दिनांक १०-४-१९९७

३. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.बीसीसी-१२०७/प्र.क्र.५३/०८/१६ ब, दि. १६.०६.२००८

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील दर्शविलेल्या कर्मचा-यांना "**कार्यदेशक**" वेतनश्रेणी ( PB-2) **Rs. 9300-34800/- Gr.Pay 4300/-** या पदावर पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव,पदनाम व कार्यालय | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदावरील पदस्थापनेचे ठिकाण/कार्यालयाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| १ | श्री. एम. एन. वडमारे, प्रभारक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथे रिक्त असलेल्या **कार्यदेशक** या पदावर |
| २ | श्री. एस. टी. कुलकर्णी, प्रभारक, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | खुला | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर येथे रिक्त **कार्यदेशक** या पदावर |

वर नमूद केलेली पदोन्नती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१. सदर पदोन्नत्या मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक २८.११.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२७९७/२०१५ च्या अंतीम निर्णयाच्या अधिन राहतील.

२. पदोन्नती देण्यात आलेल्या वरील कर्मचा-यांनी तात्काळ पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे. जे कर्मचारी पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शवतील, त्यांना सदर पदोन्नती स्विकारण्यास स्वारस्य नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
३. सदर कर्मचा-यांची वरील संवर्गातील सेवा जेष्ठता ही विहीत मुदतीत सदर पदावर हजर होण्यावर अथवा मुदत वाढीवर अवलंबून राहील.
४. पदोन्नतीमुळे संबंधीतांना वेतननिश्चिती बाबतचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन/१०८२/सीआर-११००(एक)/सेवा-३,दि. ०६ नोव्हेंबर,१९८४ मधील तरतुदीनुसार रुजू होण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कार्यालयात सादर करावा लागेल.
५. पदोन्नतीने बदली झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या संस्था प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी तात्पुरती पर्यायी व्यवस्था करुन तातडीने कार्यमुक्त करावे.
६. कर्मचा-यांच्या पदोन्नतीने नियुक्त्या या व्यापक लोकहितार्थ व प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या असल्या कारणाने सदर आदेशाविरुध्द कोणत्याही अभिवेदनाचा विचार केला जाणार नाही.

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरित होणेसाठी कार्यालय प्रमुखांनी संबंधीत कर्मचा-यास पर्यायी व्यवस्था करुन त्वरीत कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित कर्मचा-याने नियुक्तीच्या ठिकाणी विनाविलंब रुजू व्हावे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**प्रत :- माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.**

१) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय औरंगाबाद
३) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना/बीड/शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर
४) वरीष्ठ कोषागार अधिकारी, वरिष्ठ कोषागार कार्यालय,औरंगाबाद
५) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जालना/बीड/लातूर
६) संबंधीतांस (संस्था/कार्यालय प्रमुखांमार्फत) अनुपालनास्तव.
७) वैयक्तीक नस्ती.